Impact Factor – 6.625 | Special Issue – 238 | February 2020 | ISSN – 2348-7143


INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-Research Journal

PEER REVIEWED, INDEXED AND REFEREED JOURNAL

# प्रसार माध्यमे आणि समाज



- GUEST EDITOR -

Dr. Kishor R. Pathak

- CHIEF EDITOR -

Dr. Dhanraj T. Dhangar

- EXECUTIVE EDITORS -

Prof. Arun D. More

Prof. Ajay D. Patil

For Details Visit To : www.researchjourney.net

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

Scanned with OKEN Scanner

ISSN : 2348-714
February 202

# : C O N T E N T S :

## मराठी


१. **ईस्ट इंडिया कंपनी काळातील भारतीय वृत्तपत्रांचे योगदान** ........................................
प्रा. डॉ. रमाकांत अंबादास चौधरी

२. **राष्ट्रीय सुरक्षा व प्रसार माध्यमे** ........................................
प्रा. डॉ. एस. आर. पाटील

३. **वृत्तपत्र या प्रसारमाध्यमाचा इतिहास** ........................................
प्रा. डॉ. शकुंतला एम. भारंबे

४. **साहित्य आणि प्रसारमाध्यमे** ........................................
प्रा. डॉ. भारती अशोक_बेंडाळे

५. **सोशल मिडियाचा कुटुंबव्यवस्था व नातेसंबंधावर परिणाम** ........................................ १
प्रा. डॉ. दिलीप आर. चव्हाण

६. **प्रसार माध्यमाचे स्वरुप व जागतिकीकरणाविषयी लेखन केलेल्या निवडक मराठी कादंबऱ्यातून प्रसार माध्यमांचे वर्णन** .......... १
डॉ. किशोर आर. पाठक

७. **समकालीन समाजवास्तव व माध्यमांची भूमिका** ........................................ १
प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे

८. **पर्यटन विकासातील प्रसार माध्यमांच्यायोगदानाचे स्वरुप व महत्व** ........................................ १
प्रा. डॉ. जयश्री वाय. पडोळे, डॉ. अमोल प्रकाशराव वारे

९. **भारतीय राष्ट्रीय सुरक्षा व्यवस्थेतील प्रसार माध्यमांची भूमिका** ........................................ १
प्रा. डॉ. एन. झेड. पाटील

१०. **भारतीय राजकारणात प्रसार माध्यमांचे महत्त्व** ........................................ २
प्रा. डॉ. प्रकाश बाबुराव तितरे

११. **प्रसार माध्यम आणि समाज जीवन** ........................................ २
डॉ. आर. आर. पाटील

१२. **भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेच्या मुल्ये विकासात प्रसार माध्यमाची भूमिका** ........................................ २
प्रा.डॉ.आर. एस. पवार

१३. **वर्तमानपत्र एक प्रभावशाली माध्यम** ........................................ ३
प्रा.डॉ.राहुल यशवंतराव_निकम

१४. **प्रसार माध्यम व भारतीय समाज व्यवस्था** ........................................ ३
प्रा. डॉ. विजय टोंगे

१५. **साहित्य विकासात प्रसार माध्यमांची भूमिका** ........................................ ३
प्रा. डॉ. आनंदा बाबुराव सोनवणे

१६. **भारतीय लोकशाहीत प्रसार माध्यमांची भूमिका** ........................................ ३
प्रा. डॉ. हिरालाल सोमा पाटील

१७. **चित्रपट आणि प्रसारमाध्यमे** ........................................ ३
प्रा. डॉ. ललित अधाने

१८. **भारतीय समाज व्यवस्था व प्रसारमाध्यमे** ........................................ ४
डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर

१९. **प्रसारमाध्यमे आणि पर्यटन विकास** ........................................ ४
प्रा.डॉ.सिंधू भंगाळे

२०. **शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वृत्तपत्रातील वार्तांकन, कारणे आणि उपाय** ........................................ ४
डॉ. दिनकर माने, सूर्यवंशी भगवान नागोराव






Scanned with OKEN Scanner

ISSN : 2348-7143
February 2020
RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.625 | Special Issue 238 : प्रसार माध्यमे आणि समाज

19-20

# भारतीय समाज व्यवस्था व प्रसारमाध्यमे

डॉ. रावसाहेब भिमराव नेरकर
इतिहास विभाग
राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा

IQAC PAROLA Dist. Jalgaon

**प्रस्तावना :–**

भारतीय समाज व्यवस्थेतील प्रसारमाध्यमे हा घटक म्हणजे त्यातील अविभाज्य अंग झालेले आहे. समाज विकासात प्रसार माध्यमांची भुमिका अतिशय महत्वपूर्ण ठरते. आपण आदी मानवाच्या काळापासून तर थेट २१ व्या शतकाच्या पुढारलेल्या, वैज्ञानिक दृष्ट्या सक्षम झालेल्या मानवाच्या विकासाचा अभ्यास केला तरी त्यातील प्रसार माध्यमांची भुमिका निश्चितच मोलाची वाटते. आधुनिक युगातील मानवी समाजाचा सर्वांगिण क्षेत्रात झालेला विकास हा प्रसारमाध्यमाद्वारे झालेल्या जागृतीचाच परिणाम आहे. प्राचीन काळात जीवघेण्या आजारांना देवाकदिकांचा प्रकोप असे मानणाऱ्या अशिक्षित, मागासलेल्या समाजात प्रबोधन करून त्यांचे नाहक जाणारे बळी थांबवून अशा आजारांपासून वैद्यकीय इलाज करून दुरूस्त होऊ शकतो हे प्रसार माध्यमांनी सर्व सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्याचे काम केले. प्रसारमाध्यमे ही समाज विकासाचे व समाज प्रबोधनाचे प्रभारी साधन मानले जाते. आपली भारतीय समाजव्यवस्था थेट २० व्या शतकाच्या पुर्वाधीपर्यंत अंधश्रद्धा, रूढी परंपरांच्या शृंखलेत बंदिस्त झालेली होती. समाजात अतिशय चुकिच्या आणि वाईट प्रथा-परंपरांचे प्राबल्य होते. धर्मभेद, जातीभेद, लिंगभेदाच्या विचारांनी सारी समाज व्यवस्था जखडली गेली होती. अशा समाज व्यवस्थेत वैज्ञानिक दृष्टी देण्यांचे महत्वपुर्ण कार्य प्रसारमाध्यमांनी केलेले आहे. समाजव्यवस्थेतील वर्गभेदाच्या आणि लिंगभेदाच्या विरोधात प्रबोधनाची महत्वपुर्ण भुमिका प्रसारमाध्यमांनी पार पाडली. समाजव्यवस्थेच्या सर्वांगिण अंगाचा विकास हा प्रसारमाध्यमांच्याद्वारे होणाऱ्या प्रबोधनामुळेच शक्य झाले.

**प्रसारमाध्यमांची भुमिका :–**

प्रसारमाध्यमांची समाज व्यवस्थेतील भुमिका कशी असायची होती. ती आज कशा प्रकारची आहे. या विषयी निश्चितच विचार मंथन होणे गरजेचे आहे. पुणे याठिकाणी नुकतीच माणुस घडवणारे शिक्षण या विषयावर एक शिक्षण परिषद घेण्यात आली. या प्रसंगी शिक्षण आयुक्त श्री. विशाल सोलंकी यांनी केलेले विधान पुढारलेल्या प्रगत समजणाऱ्या समाजव्यवस्थेला आत्मपरिक्षण करण्यास भाग पाडणारे आहे. ते म्हणाले, उच्चशिक्षित समाज घडवून उपयोग नाही, तर तो समाज त्या शिक्षणाचा वापर कोणत्या उद्देशाने करणार आहे. यावर त्या देशाचे भविष्य अवलंबुन असते. म्हणूनच चारित्र्य संपन्न समाज निर्मिती हे आपले उद्दिष्ट असले पाहिजे. समाजव्यवस्थेत प्रसार माध्यमे महत्वपुर्ण भुमिका पार पाडतात. नव्हे ते त्यांचे कारण कर्तव्य मानले तर निश्चितच चारित्र्य संपन्न समाज निर्मिती हे त्यांचे उद्दिष्ट असलेच पाहिजे. प्रसारमाध्यमांद्वारा कशा चारित्र्य संपन्न समाजाची निर्मिती होते का हा एक संशोधनाचाच विषय आहे. या बाबतीत आम्ही प्रसारमाध्यमांना दोष देत बसायचे कि प्रसारमाध्यमांचा आम्ही किती आणि कसा वापर करतो या विषयी आत्मपरिक्षण करायचे हे समाजव्यवस्थेतील प्रत्येक घटकांने ठरवायचे आहे. विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टी विकसित होण्याआधीच्या कालखंडात अनाकलनीय वाटणा भोवतीच्या घटनांचा किंवा वस्तुस्थितीचा आपल्या परीने अन्वयार्थ त्याकाळातील कथा गीतांच्या माध्यमातून केला. १९ व्या शतकाच्या समाज सुधारणा आंदोलनाच्या माध्यमातून वृत्तपत्र, मासिके तसेच सभा-संमेलनातुन समाज प्रबोधन केले गेले. राजाराम मोहनरॉय, महात्माफुले, डॉ. आंबेडकर, महर्षी कर्वे, पंडीता रमाबाई अशा असंख्य सुधारकांनी आपल्या लेखनीच्या जोरावर समाज जागृती करण्याचे कार्य केले. जुलमी अत्याचारी ब्रिटीश सत्ता उचलून टाकण्यासाठी लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांसारख्या नेत्यानी ब्रिटीश प्रशासनाविरुध्द स्वातंत्र्यांची भावना निर्माण केली. राष्ट्रवादाची-राष्ट्रप्रेमाची भावना जागृत केली.

भारतीय समाज व्यवस्थेच्या सामाजिक, सांस्कृतीक, राजकीय, अशा सर्वांगीण क्षेत्रात समाजमाध्यमांची भूमीका प्रत्येक कालखंडात प्रभावी ठरलेली आहे. समाजात आत्मभान निर्माण करण्याचे महत्वपूर्ण कार्य प्रसारमध्यामे करीत असतात. समाज व्यवस्थेला प्रसारमध्यामांद्वारा आदर्श रूप देण्याचे कार्य होऊ शकते.

**प्रसारमाध्यमांचे बदलते रूप आणि समाज व्यवस्था :–**

काळाच्या ओघात भारतीय समाज व्यवस्थेत क्रांतीकारी बदल होऊ लागले. अंधश्रद्रा रूढी-परंपरामध्ये गुरुफटलेल्या समाजाने शिक्षणाची आस धरली. त्यातुनच वैज्ञानिक दृष्टी समाजाला लाभली. जादू टोणा, भुत-पिश्याच्च जाऊन वैद्यकिय क्षेत्रात विलक्षण प्रगती झाली. परंपरागत जातीव्यवस्था नष्ट होऊन सामाजिक समता निर्माण होऊ लागली. समाजातील प्रत्येक घटकांला शिक्षण घेण्याचा मुलभूत अधिकार प्राप्त झाला. भारतीय समाज व्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील बदलणाऱ्या रूपात प्रसारमाध्यामाचा मोलाचा वाटा होता. विसाव्या शतकात सुरू झालेल्या विज्ञान आणि तंत्रज्ञान युगावर प्रसारमाध्यमाचा मोठा प्रभाव दिसून आला. प्रसारमाध्यमाचे हे बदलते रूप जितके प्रभावी तितकेच मोहजाला सारखे घातकही ठरू लागले. डिजीटल तंत्रज्ञानात समांतर पणे घडवून आलेल्या तिन प्रवाहांच्या त्रिवेणी संगमामुळे सर्व सामान्य माणसांचे दैनदिन आयुष्य पूर्णपणे बदलूनच गेले. आज आपल्या हाताशी असलेले फेसबुक, ईस्टाग्राम या सारखी समाजमाध्यम व्हॉटसअ‍ॅप सारखी संर्पक साधने आणि त्यासोवत असेलेली ४जी/५जी तंत्रज्ञानाधारीत इंटरनेटची सुविधा क्षणोक्षणी त्यावर होणाऱ्या माहीतीची योग्य पदधींतीने व अंत्यत कमी पैशात साठवण करण्यासाठी डेटावेस व क्लाऊड तंत्रज्ञानात झालेली प्रगती तर तिसरा प्रवाह म्हणजे या सर्वत्र विखुरलेल्या माहीतीच्या प्रसारांची सागड



Self Attested

Scanned with OKEN Scanner